दै. गोदातीर दि. 24/01/2024

# जबरी चोरी व मोबाईल चोरीतील आरोपी मुद्देमालासह अटक



**नवीन नांदेड-** नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने जबरी चोरी व मोबाईल चोरी प्रकरणातील एका आरोपीस मंगळवारी अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीचे पाच मोबाईल जप्त केले आहेत.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले असून ते कमी करण्यासाठी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस .अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी आदेश दिले होते. त्यानुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एन. एस. आयलाने यांनी पथक स्थापून आरोपींचा तपास सुरु केला. गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, विक्रम वाकडे, प्रभाकर मलदोडे, ज्ञानोबा कवठेकर, शेख सत्तार मगदूम, अर्जुन मुंडे, संतोष बेलुरोड, शिवानंद तेजबंद, श्रीराम दासरे, सायबर सेलचे शिवानंद कानगुले यांनी तपास करीत आरोपी शेख समीर शेख चाँद (वय २४ वर्षे) व्यवसाय बेकार रा. घर नं. ५३५ वाजेगाव ता. जि. नांदेड यास अटक केली. आरोपीची कसून चौकशी केली असता मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याचे कबूल केले. तसेच चोरी केलेले पाच मोबाईल आरोपीने काढून दिले. ते पोलिसांनी ताब्यात घेतले.

# पंजाबमधील खुनी नांदेड पोलिसांच्या ताब्यात

**नांदेड :** पंजाबमधील कुख्यात गँगस्टर अमृतपालसिंघ बांठ याच्या टोळीतील एक साथीदार पंजाबमध्ये एकाचा खून करुन पसार झाला होता. त्याला पंजाब पोलिसांच्या माहितीवरुन नांदेड पोलिसांनी अकोल्यातून ताब्यात घेतले आहे. या आरोपीला पंजाब पोलिसांच्या हवाली करण्यात येणार आहे.

पंजाबमध्ये कुख्यात अमृतपालसिंघ बांठ या गुन्हेगाराच्या टोळीने उच्छाद मांडला आहे. त्याच्या टोळीतील जुगराजसिंघ काबलसिंघ याने नुकताच एकाचा पंजाबमध्ये खुन केला आणि तो पंजाबमधून फरार झाला होता. या प्रकरणी पंजाबमधील तरणतारण जिल्ह्यातील जबाल पोलिस ठाण्यात गुरनं ४/२४ कलम ३०२,१२० ब, ३४ ,शस्त्रास्त्र कायदा कलम ३/२५ दाखल करण्यात आला. खुनानंतर जुगराजसिंघ हा पळून नांदेडला गेल्याची माहिती पंजाब पोलिसांनी नांदेड पोलिस दलातील अधिकाऱ्यांना दिली. तेव्हा पोलिस अधीक्षकांनी या आरोपीच्या शोधार्थ एक पथक स्थापन केले.सदर पथकाने नांदेडमध्ये २ दिवस फरार आरोपीचा शोध घेतला परंतु तो नांदेडमधून पंजाबकडे रेल्वेने रवाना झाल्याचे कळाले. सायबर सेलच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीचे मोबाईल लोकेशन नांदेड पोलिसांनी हस्तगत केले असता सदर आरोपी हा नांदेडवरुन श्री गंगानगर एक्सप्रेसने पंजाबकडे निघाल्याचे कळाले. सदर आरोपीचे तिकीट,बोगी नं. व आसन क्रमांकाची माहिती मिळवून आरोपीला पकडण्यासाठी हे पथक वाशिम, अकोल्याकडे निघाले. परंतु सदर आरोपी हा चालत्या ट्रेनमध्ये असल्याने त्याचा बोगी व आसन क्रमांक लोहमार्ग पोलीस ठाणे, अकोला यांना कळवून अकोल्यात गाडी थांबल्यावर आरोपीला ताब्यात घ्या, असे सांगितले. नंतर नांदेड पोलीस पथक अकोला रेल्वे स्थानकावर पोहचले आणि या आरोपीला ताब्यात घेऊन नांदेडला आणले. आरोपी जुगराजची चौकशी केली असता कुख्यात गँगस्टर अमृतपालसिंघ बांठ (रा.मियापुर ता. जि. तरणतारण) याचा तो जवळचा हस्तक असून तो तरणतारण येथे राहून त्याच्या गँगसाठी काम करीत असे. अमृतपालसिंघ बांठ हा सध्या जर्मनीत असून तेथून तो त्यांची टोळी नियंत्रित करतो. त्याच्यावर पंजाबमध्ये १८ ते २० गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी २ गुन्हे बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक कायदा (वअढअ) प्रमाणे दाखल आहेत. खून करुन पसार झालेल्या जुगराजला पकडण्याची कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक नांदेड अविनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक, संतोष शेकडे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ आडे, गंगाप्रसाद दळवी, पोहेकॉ राजू सिटीकर,दीपक ओढणे, सायबर सेल पोकॉ राजीव बोधगिरे, अनिल बिरादार, अशोक म्हस्के, अकबर पठाण यांनी पार पाडली.